।। श्रीस्वानंदेशो गणेशो विजयते ।।

(गणेशभक्त व श्रीयोगीन्द्रमठ शिष्यांकरिता)

– श्रीगणेश कृपासाधक –

# ।। श्रीस्वानंदेश-स्तोत्र ।।

श्रीगा. बालविनायक स. लालसरे
श्रीगाणेशजगद्गुरूपीठ योगीन्द्रमठ
– मोरगांव –

(सर्व हक्क गुरूपीठाचे स्वाधीन )

## ।। श्रीस्वानंदेशस्तोत्र-रत्न ।।

## (प्रास्ताविक परिचय व पाठक्रमसूचि)

१-स्वानंदेशस्तोत्राचे पठण, देवालयांत किंवा देवघरांत, देवमूर्ती समोरबसून, शुचिर्भूतपणे व स्वस्थ चित्ताने करावे. प्रथम गणेशदेवता व गणेश सद्गुरु यांना नमस्कार करून पठणास बसावे. खालील मंत्राने कुट्टन करून स्तोत्रपठणास आरंभ करावा; प्रत्येक ओवी होताच **'जय जय गणेश'** असे म्हणत जावे. स्तोत्रपाठ चालू असता बोलू नये ! स्तोत्रपाठ मोठ्याने करणे उत्तम अथवा आपले आपणास ऐकू येईल, इतक्या मोठ्याने म्हणावे. स्तोत्रपाठाचा क्रम असा - स्वानंदेशस्तोत्र संपूर्ण म्हणून श्रीनग्नभैरव-स्तोत्राचे अकरा पाठ करावेत. शेवटी प्रतापी भैरवस्तोत्र मानसपूजापद व श्रीमद्योगीन्द्र गुरुनमनाष्टक म्हणून पूर्ण करावे. हा नेहमीचाच क्रम समजावा. विशेष कामनासिद्धीसाठी अधिक पाठ करावयाचे असतील, तेव्हा स्वानंदेश स्तोत्राचा एक पाठ व श्रीनग्नभैरव-स्तोत्राचे अकरा पाठ मिळून एक आवृत्ति समजावी आणि अशा क्रमाने प्रतिदिवशी, तीन, सात, दहा, अकरा, सोळा, अगर एकवीस अशा संख्येचे अनुष्ठान साधावे व शेवटी मानसपूजापद वगैरे अवशिष्ट भाग म्हणून संपवावे. दोन्ही चतुर्थ्यांचे पूर्ण उपोषण करूनच गणेशसेवा केली पाहिजे; तरच फळ मिळेल. ।। इत्यलं गणराजः ।।

(कुट्टन-मंत्र) शुक्लांबरधरं देवं शशिवर्णं चतुर्भुजम् ।
प्रसन्नवदनं ध्याये सर्वविघ्नोपशांतये ।।१।।

स्वानं-
देश ॥
स्तोत्र-
रत्न ॥
॥ १ ॥

अथश्रीमत्सद्गुरू अंकुशधारीयोगीन्द्र-महाराज-कृतम्

# ॥ श्रीमत्स्वानंदेशस्तोत्रम् ॥

(प्राकृत ओवीबद्ध)

श्रीगणेशाय नमः। श्रीसिद्धिबुद्धिभ्यां नमः । श्रीलक्ष-लाभाभ्यां नमः । श्रीमद्गणेशयोगीन्द्राचार्यवर्याय नमः । श्रीमदंकुशधारिणे सद्गुरवे योगींद्राय नमः । श्रीस्वानंदेशाय ब्रह्मणस्पतये नमः ॥ (कुट्टन करून म्हणावे.)

नमो श्रीमद्गजानना। ओंकाररूपा सनातना। मयूरेशा मंगलघना । स्वानंदनाथा ॥१॥ आतां नमूं सिद्धिमाय । जे ब्रह्मराज्ञी[1] चिन्मय । कार्यसिद्धि जिचेनि होय । तीतें अनन्य शरण मी ॥२॥ आतां बुद्धी सरस्वती । प्रणमूं भावें आत्मज्योति । चित्कला[2] जी पंचवृत्ति । मयी पूर्ण परेशा

---

१-परब्रह्माची निर्गुणरूपा क्रियासत्ता; २-ज्ञानप्रकाशक स्फूर्तिसत्ता

स्वानंदेश॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ २ ॥

।।३।। नमूं लक्ष-लाभ नंदन । ज्यांविण हालेना पान । तात ज्यांचा सच्चिद्घन[३] । मंगलमूर्ति परेश ।।४।। नमूं श्रीमुद्गल गणकाचार्य । भरूशुंड्यादि परम आर्य । गाणेश्वरांचे आचार्य । ख्यात वेदपुराणीं ।।५।। आद्य गाणेशाचार्यप्रवर । ब्रह्मभूय-सिद्धि पीठेश्वर । गिरिजासुतयोगींद्रयतिवर । अनन्य भावे वंदितों ।।६।। परमयोगींद्र-शिरोमणि । जे कां साक्षान्मुद्गलमुनि । श्रीगणेशयोगीन्द्र पुण्यखाणी । साष्टांगभावें वंदितों ।।७।। पुन्हा नमूं इष्ट देव । पंचस्वामी[४] जो स्वयमेव । सर्वेश्वर देवाधिदेव । गणराज दयाळू ।।८।। जयजयाजी भालचंद्रा । मयूरेशा पूर्णभद्रा । करूणेचिया महासमुद्रा । श्रीविघ्नराजा ।।९।। जयजय स्वामी चिंतामणि । जयजय हेरंब पाशपाणी । जय ढुंढे कैवल्यखाणी । परमसमर्था गणनाथा ।।१०।। जयजय योगरूपा परमा । जयजय श्रीमंगलधामा । जयजया भक्तपूर्णकामा । गणाधीशा

---

३–गजाननमूर्ति प्रत्यक्ष तत्त्वमसिस्वरूप असल्याने, तो सच्चिदानंदमय ठरतो.

४–ब्रह्मा, विष्णु, शिव, शक्ति व सूर्य या पांच परमेश्वरांचा नियंता

कृपाळा ।।११।। चिंतामणीद्वीपेश्वरा । जय इक्षुसागराविहारा । आनाद्यंता निर्विकारा । अंकुशधारी परेशा ।।१२।। जयजय विधिजानिवासा[५] । दुष्टदुर्जनां विध्वंसा । जय शिवादि कुलावतंसा । हरिहर-जनका गुणेशा ।।१३।। जयजय सगुणनिर्गुणा । जय परम कारणकारणा । विघ्नेश्वरा खलविदारणा । स्वानंदनिलया परमात्म्या ।।१४।। जय सिद्धिबुद्धि प्राणनाथा । जय श्रीलक्षलाभ-ताता । जय मोरेश्वरा समर्था । दीनबंधु विनायका ।।१५।। जय मदादिदैत्यभंजना । योगिभक्त हृदय-रंजना । विघ्नस्वरूपा परमांजना । विष्णुशर्वादि ब्रह्मिष्ठां[६] ।।१६।। जय अनंत लीलाकरा । जयजय अनंत अवतारा । जयजय प्रभो दीनोद्धारा । करूणाकरा वरदेशा ।।१७।। जयजय ब्रह्मभूयदायका । जय ज्येष्ठराजा विनायका । अखंड निजानंददायका । त्रितापहारा

---

५-ब्रह्मदेवाच्या पुत्री ज्या सिद्धिबुद्धि त्यांचा पति. ६-विष्णु-शिवादि परमेश्वर ब्रह्मस्वरूप असले, तरी ब्रह्मणस्पतीच्या स्वाधीन आहेत, त्यांना 'आम्हीच पूर्ण ब्रह्मरूप आहोत' असा अभिमान होतो; त्यावेळी त्यांना विघ्न देऊन त्यांच्या डोळ्यांत अंजन घालतो, असा अर्थ.

स्वानंदेश ॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ ४ ॥

विश्वेशा ॥१८॥ जयजय परमशांतिरूपा । ब्रह्मणस्पते गणाधिपा । योगनाथा निर्विकल्पा[७] । अजयार्चितपादाब्जा ॥१९॥ जयजय गणेशा ढुंढिराजा । जय महोदरा विश्वबीजा[८] । धरणीधरा चिंतामणी राजा । मंगलमूर्ते विनायका ॥२०॥ जय हेरंबा गजानना । एकदंता सनातना । वक्रतुंडा वरदा स्वानंदघना । आशापूरका कृपाळा ॥२१॥ जय ज्येष्ठराजा लंबोदरा । ब्रह्मणस्पते विघ्नेश्वरा । सर्वपूज्या विकटा परात्परा । सिद्धिबुद्धिपते मयूरेशा ॥२२॥ अगा प्रभो विनायका स्वभक्त-सौख्यदायका । करितो विनंति आयका । शूर्पकर्णा सादर ते ॥२३॥ प्रार्थनाशतक निर्मळ । करितसे मी अज्ञ बाळ । ऐकूनि सद्बुद्धि निश्चळ । द्यावी तुवां दयाघना ॥२४॥ तूंचि माझी जननी जनक । गणगोतही सकळिक । म्हणूनि तुजलाचि हांक । मारितसें मी दयाळा ॥२५॥ जगज्जनक पंच देव । तज्जनजनक[९] तूं स्वयमेव । म्हणुनी

---

७-अजयशक्तीने सेवा केली आहे, असा. ८-विश्वविलासाचे मूळ ब्रह्मणस्पति गणेश आहे. ९-जगदीश्वर पंचदेव गुणेशाचे पुत्र व गुणेशाचा पिता गणेश.

स्वानंदेश ॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ ५ ॥

आतां करी कीव । देवदेवा गणनाथा ॥२६॥ अगा देवा गजानना । सोशिल्या अनंत-गर्भयातना । हिंपुटी[१०] होऊनि दैना । अत्यंत माझी झाली पै ॥२७॥ तूं भक्तजनांचा सहाकारी । ऐसे गर्जती वेद चारी । म्हणुनि शरण मत्सरारी । तुज पातलो दयाळा ॥२८॥ देवा मी तों अनंत दोषी । अनंत पातकांचा राशी । परी कृपाळुत्वी[११] तुझ्या विशेषीं । स्वस्थपणें आहें बा ॥२९॥ अनंत भक्त तुवां रक्षिले । ऐसें शास्त्रीं म्यां परिसिलें । म्हणूनि चित्त स्वस्थ झालें । भय उडालें भवाचें ॥३०॥ मयूरेशा कृपाघना । मत्पापासी नाहीं गणना । माझ्या भारें विष्णुललना तीही भारी कांपेल ॥३१॥ जरी ऐसा मी चांडाळ । परम नष्ट दुष्ट खळ । तथापि माझी तळमळ । तुजवीण कोणा लागेना ॥३२॥ नेणोनि तुज गजानना । पडलों शास्त्रप्रवाहीं नाना । झाली सर्वथा विटंबना । सर्वत्र माझी ॥३३॥ आतां तुझेचि एक चरण ।

---

१०–अत्यंत त्रासांमुळे निराश होणे. ११–तुझ्या दयाळूपणामुळे, माझे दोष सहज नाहीसे होतील, या निश्चयामुळे, मी निर्भय झालो.

स्वानंदेश॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ ६ ॥

माझें करितील संतारण । म्हणुनि अनन्यत्वें शरण । तुज दयाळा आलों मी ।।३४।। आनखशिखान्त पापखाणी । जरी आहे चिंतामणी । तरी तुजविण माझें कोणी । आतां नाहीं गणराया ।।३५।। गणेशसेवक द्वारगत । ऐसें आपणां मी म्हणवीत । आतां उपेक्षिसी जरी किंचित । तरी दुर्लोकिक तुझाची ।।३६।। सिद्धिबुद्धि तुझ्या रमणी । महालक्ष्मी तुझ्या चरणीं । आम्ही भिक्षेकरी होउनि । ब्रीद तुझेचि जाईल ।।३७।। ईश्वर तुझा तो किंकर । तैसाचि दुजा लक्ष्मीवर । मग आम्ही दारोदार । काय म्हणोनि भ्रमावें ।।३८।। शुक्ल विरोचनेसी तुवां । नुपेक्षिलेंसी देवदेवा । त्यांहीं काय तुजला भावा- । विणें दुजें अर्पियलें ।।३९।। देवा ज्याचा अंगिकार । श्रेष्ठ करिती एकवार । तदुपेक्षा पुन्हा धीर । कोणी करितां नायकिला ।।४०।। तरी तूंहि सिद्धिकांत । मज अंगिकारूनि यथार्थ । आतां उपेक्षिसी तरी यांत । लाज जाईल कोणाची ।।४१।। गणेशा मी दुरितखाणी । नाहीं माझी मधुर वाणी ।

जन्मूनियां-मायराणी । मियां व्यर्थ कष्टविलीं ॥४२॥ सदा कामकोपें हत । देवा झाले माझें चित्त । कधीं भाषण यथार्थ । म्यां चांडाळें न केलें ॥४३॥ नाहीं कर्म उपासन । नाहीं शास्त्रपुराणश्रवण । नाहीं गाणेशांसी प्रणमन । मियां खळें केलें कधीं ॥४४॥ नाहीं पाळिला आचार । कधीं न केला सद्विचार । आळसाचें तो कोठार । अति पामर मी ऐसा ॥४५॥ दंभ लोभ अभिमान । ईर्ष्या असूया मत्सर मान । मोह मद विषयघाण । पूर्ण अंतरी सांठविली ॥४६॥ संपूर्ण सागरांची मषी[१२] । सर्व वनस्पती लेखणीशी । धरणी करूनि पत्रासी । जरी शारदा लिहील ॥४७॥ तरी माझा पापपार । न लागेल तिशीं पर । सहस्रानन फणीश्वर । तोहि भागेल वर्णितां ॥४८॥ असो ऐसा मी दुरितघन । आहें जरी गजानन । तरी तुझे धरिले चरण । तेणें मन संतोषले ॥४९॥ जरी नामा पापी[१३] पूर्ण । परी तुझें करितां स्मरण । तया कोण

---

१२-शाई (समुद्राची शाई केली व वनस्पतीच्या लेखण्या केल्या आणि स्वत: शारदा लिहिण्यास बसली; तरी माझी पापे लिहून संपणार नाहीत.) १३-नामा कोळी गणेश-नामजपाने भ्रूशुंडी झाला.

स्वानंदेश ॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ ८ ॥

गजानन । न म्हणे सांग दयाळा ॥५०॥ परीस[१४] लोहासी झगटतां । त्यांतें लोह म्हणणें वृथा । तैसे तुझें नाम स्मरतां । उरी दुष्कृतां कोठूनी ॥५१॥ आतां अपराधी म्हणून । त्यागणें हें तों देवा गौण । पूर्वीच सर्वज्ञा विचारून । अंगिकार न करावा ॥५२॥ जगांतही ऐसी रीति । आधीं कन्यालक्षणे शोधिती । पदरीं पडतां पवित्र म्हणती । मग न त्यागिती सर्वत्र ॥५३॥ तरी आतां गजानना । करीं मद्दुष्कृतकंदना । तेणे होऊनि पावना । अपावनत्व नासेल ॥५४॥ तव नामापुढें काय । राहील मत्पापसंचय । क्षणार्धात होईल विलय । एवढें साच जाणें मी ॥५५॥ तव नाम कलिमलहर । तैसे पतितपावन सार । विघ्नहर हें तों लहान थोर । तुज एकासीच म्हणताती ॥५६॥ आतां स्वामी मयूरेशा । ऐका मद्विनंति लेशा । तुम्हां मागणे धीनिवासा । नामप्रीति[१५] राहो हें

---

१४– ज्या लोखंडाला परिसाचा स्पर्श होतो, ते लोखंड कुठे उरते? सोनेच होते. त्याप्रमाणें तुझे नाम स्मरण करणाराचे पाप राहातच नाही इत्यादि. १५–तुझ्या नामाविषयींची आवड मात्र माझ्या मनात राहू दे.

॥५७॥ जरी अनंत नामधर । अनंतवेष लीलाकर । तथापि स्मरतों सारसार । नामें तुझीं गजानना ॥५८॥ श्रीगजानना विघ्नहरा । गणाधीशा परात्परा । सिद्धिरमणा मोरेश्वरा । भालचंद्रा विघ्नेशा ॥५९॥ मत्सररिपो हरिहरजनका । स्वानंदेशा विनायका । सिद्धिबुद्धींच्या नायका । वरदराजा हेरंबा ॥६०॥ मंगलमूर्ते मंगलघना । चिंतामणे जगज्जीवना आदिपुरूषा सनातना । पंचजनका ढुंढीशा ॥६१॥ इक्षुसागरनिवासा । चिंतामणिद्वीपाधीशा[१६] । शारदाकांता अविनाशा । लक्षलाभजनका हे ॥६२॥ सिंदूरादि-दैत्यभंजना । वक्रतुंडा निरंजना । ब्रह्मणस्पते स्वानंदघना । स्वसंवेद्या सुखसिंधो ॥६३॥ भक्तप्रिया अंकुशधरा । पाशपाणी वरदेश्वरा । अगम्यचरिता[१७] - विधि-हरिहरां । वरप्रदा पद्मेशा ॥६४॥ विद्याऽविद्यारमणा परा । निजनाथा हे असुरहरा । विनायका विधिजावरा । अनंत ब्रह्मांडनाथा हे

---

१६-चिंतामणीद्वीप नामक कार्यस्वानंदलोकाचा स्वामी. १७-ज्याच्या चरित्राचे आकलन विष्णू-शिवादिकांनाही होत नाही.

स्वानं-देश ।। स्तोत्र-रत्न ।। ।। १० ।।

।।६५।। अनंत ब्रह्मयांच्या जनका[१८] । अनंत महाविष्णुपालका । अनंत शंकरसंहारका । अनंत शक्तिशक्तीशा ।।६६।। अनंत भानुप्रकाशका । अनंत गुणेशचालका । अनाद्यंता निर्नायका[१९] । प्रणवमुखा गणेशा ।।६७।। शांतिस्वरूपा योगेश्वरा । तत्वमसि वेषधरा । योगाधीशा परतरपरा । निर्मायिका धीपते ।।६८।। यापरी स्मरतां नामोच्चारीं। हृदयीं प्रगटला विघ्नारी । कैसा तोहि आतां चतुरीं। सावध चित्तें परिसावा ।।६९।। मूर्ति परम दैदीप्यमान। देखतां झाकुळले नयन। हृदय झालें सुप्रसन्न । तनु-मन[२०] सर्व विरालें ।।७०।। आरक्तवर्ण तळवटें दिसतीं । ज्यांसी हरिहर हृदयीं चिंतिती । ध्वजांकुश-परशु विराजती । जयांवरीं सुकोमळ ।।७१।। ताम्रापरी आरक्तवर्ण ।

---

१८-प्रत्येक ब्रह्मांडांत असणारे ब्रह्मदेवादि पंचेश्वर आणि त्यांचा नियंता गणेश, वेगवेगळे असतात. अशा त्यांचा जनक म्हणजे अनंतकोटी ब्रह्मांडाचा स्वामी गणेश आहे हा अर्थ. १९-त्याचा नायक कोणी नाही. तो मात्र सर्वांचा स्वामी आहे. प्रणवमुख म्हणजे ॐकारमुख. २०-बाह्यभान उरले नाही.

पादांगुलि-नख शोभा पूर्ण । मृदु मांसल गुल्फें[२१] जाण । सतेज शोभती प्रभूची ॥७२॥ जंघा[२२] रक्तप्रभामय । जानु[२३] तैसेच निरामय । कोमळ रोमावलीसंचय । जयीं आरक्त दिसतसे ॥७३॥ मांड्या तैशाच सुमांसल । रंभेपरी दिसती सरळ । रक्तवर्ण कटि विशाल । वर्तुळपणें विराजली ॥७४॥ कटीं आरक्त पितांबर । कशियेलासे तो सुंदर । सुवृत्त नाभिमंडळपर[२४] । फणीश्वरें निबद्ध जे ॥७५॥ मांसल-पूर्ण महोदर । जें अनंत ब्रह्मांडाधार । त्रयीमूल जें परात्पर । रोमावली विराजित ॥७६॥ तैसेच मांसल रक्तमय । शोभे वक्षःस्थल अव्यय । चिंतामणिप्रभा स्वयें । सज्ञानपणें[२५] फांकली ॥७७॥ कंठ तैसा त्रिरेखांकित । शोभला मांसल सुरक्त । वृषस्कंधे[२६] जे उपमित । सतेज स्कंध विराजती

---

२१-घोटे २२-जांगाडे, २३-गुडघे २४- सर्व नागांचा राजा, अशा शेषनागाने वेष्टित अशी नाभि. २५-गळ्यामधील चिंतामणी-रत्नमाला, वक्षस्थलावर प्रकाशित झाली आहे; जणु ज्ञानप्रकाशक अशी २६-बैलाच्या खांद्यासारखे.

स्वानंदेश ॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ १२ ॥

॥७८॥ बाहु हस्त आरक्त वर्ण । हरिहरशक्ति[२७] सूर्यमय पूर्ण । करांगुलीं विंशतिप्रमाण । नखें सुरक्त सतेज ॥७९॥ परम सुंदर ॐकारमय । मुखकमल जें गीताम्नाय[२८] । त्रिनेत्र तीक्ष्ण स्वयमेय एकदंतही शोभला ॥८०॥ भक्तां द्विविध[२९] कामदायक । कर्ण शूर्पाकृति अलौकिक । सकुंडल शोभती सुरेख । आंदोलन-निरत जे ॥८१॥ ब्रह्ममद[३०] द्रवार्थी मुनिजन । तेचि होऊनि षट्पद पूर्ण । महामंत्राचें गर्जन । कपोलभागीं करिताती ॥८२॥ भालीं पूर्ण निशापतीं । रक्ताष्टगंधें भालज्योती । सबिंदु-तंदुलें अतिनिगुतीं । सुशोभित झालीसे ॥८३॥ केशाच्छादित शोभे शिर । कुंभद्वयें मंडित साचार । वरीं रत्नखचित सुंदर । सौवर्णमुगुट झळकतसे ॥८४॥ सर्व भूषणें भूषित जाण । शोभे देह स्वानंदघन ।

---

२७–श्रीगणराज प्रभूंचे चार हात, म्हणजे विष्णु–शिवादि चतुर्विधब्रह्मे समजावीत.
२८–वेदांनी गाईलेले २९–भोगमोक्ष–स्वरूप दोन्ही कामना पुरविणारा
३०–ब्रह्मानंदरसाची इच्छा करणारे, तेच जणू भ्रमर झाले.

स्यानं-देश ।। स्तोत्र-रत्न ।। ।। १३ ।।

पाशांकुश अभयदान । रदादि आयुधें शोभतीं ।।८५।। वामांकीं श्रीआदि माया । महासिद्धि शोभे जया । दक्षिणभागीं पूर्ण चिन्मया । महाबुद्धि विराजली ।।८६।। लक्ष-लाभ दोघें नंदन । उभयांकीं[३१] शोभती जाण । सन्मुख चौरेश[३२] मोदादि गण । सेवानिरत ठेले ते ।।८७।। ऐसा तूं श्रीगजानन । साक्षाद्योगमय पूर्ण । परी मजसाठीं हें सगुण । रूप तुवां धरियेलें ।।८८।। आतां करितों तुझी पूजा । देवदेवा श्रीगणराजा । आर्षत्वे[३३] अर्पितो मूषकध्वजा । स्वीकारावी परेशा ।।८९।। भावें वंदूनी तुझे चरण । पाद्यार्घ्य आचमन मधुपर्क पूर्ण । करूनि तूंतें मंगलस्नान । पंचामृतें अर्पितसें ।।९०।। ब्राह्मणस्पत सूक्तें करून । घालूं तुज महास्नान । मग करूनियां प्रोंछन[३४] । रक्तांबरयुग्में अर्पी ही ।।९१।। स्वर्णयज्ञोपवीतदान । आतां करावें आचमन । तया उपरीं सिंदूरलेपन । सर्वांगासी करितो हे ।।९२।। मग सर्वाभरणें तुज

३१-सिद्धि व बुद्धि यांच्या मांडीवर. ३२-मूषकराजा ३३-ऋषिप्रोक्त विधीप्रमाणे (अर्थात् शास्त्रविधीना धरून) ३४- अंग पुसणे.

। अलंकारोनि गणराज । अष्टगंधे चर्चून साज । सतिलक आरक्त करितों मी ।।९३।। रक्ताक्षता अर्पूनियां । नाना सुगंध कुसुमें संचया । नाना माळा बुद्धिप्रिया । घालितों गळां प्रेमें मी ।।९४।। तयांवरी शमीदळें । तुज अर्पू सुकोमळें । उभय[35] मंदार-परिमळें । तुष्ट व्हावें परमेशा ।।९५।। हरित श्वेत दुर्वांकुर । अर्पून भावें आनंदकर । दशांग धूप दीप-निकर[36] । समर्पितो तुज हेरंबा ।।९६।। महानैवेद्य फल तांबूल । दक्षिणा[37] आवृत्ति-पूजन निर्मळ । राजोपचारदानें विमळ । स्वीकारावीं दयाघना ।।९७।। जप आरती प्रदक्षिणा । नमस्कार करूनि प्रार्थना । करितों आतां गजानना । प्रेमभरें ती स्वीकारी ।।९८।। जयजयाजी स्वानंदनिलया । गजानना पूर्ण चिन्मया । विघ्नेश्वरा निर्गुणकाया ।भालचंद्रा परमेशा ।।९९।। जयजयाजी गजानना । योगरूपा सनातना । जय

---

३५–रक्तवर्ण अर्कमंदार व श्वेतार्कमंदार, असे दोन. ३६–पुष्कळसे दिवे.
३७–आवरण देवतांचे पूजन.

स्वानंदेश ।। स्तोत्ररत्न ।। ।। १५ ।।

निष्कला निरंजना ।। केशवशिव-आराध्या[३८] ।।१००।। जयजय श्रीमयूरेशा । गणाध्यक्षा योगाधीशा । जयजयाजी परम पुरूषा । पूर्णयोगशांतिमया ।।१०१।। जयजय सिद्धिबुद्धिकांता । जयजया श्रीएकदंता । जयजय हेरंबा अनाद्यंता[३९] । ब्रह्मणस्पते गणराजा ।।१०२।। जय भक्तकामकल्पद्रुमा । जय जय गणेशा निरूपमा । जय ज्येष्ठराजा परमपरमा । निगमागम्या ॐकारा ।।१०३।। आतां तुज करूनि नमन । हेंचि मागतों वरदान । कृपा करूनि दयाघन । हेतु पुरवीं माझा हा ।।१०४।। जे कोणी भाविक जन । हा ग्रंथ करितील पठण । तयांच्या कामना सर्व पूर्ण । तुवां कराव्या गजानना ।।१०५।। विद्यार्थियां विद्या व्हावी । धनार्थ्यातें लक्ष्मी मिळावी । सर्व संकटें निरसावीं । पठणमात्रेंचि दयाळा ।।१०६।। मिळावें कीर्ति आणि यश । नष्ट व्हावे सकळ क्लेश । पुत्रार्थियांतें विशेष । पुत्र दीर्घायु

---

३८-विष्णु-शिवादिकांचे आराध्य दैवत. ३९-आदि व अंत नसले.

स्वानंदेश ॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ १६ ॥

मिळावे ॥१०७॥ सकळ रोग जे दुर्धर । कुष्ठ क्षय अपस्मार । व्हावा तयांचा संहार । ग्रंथानुष्ठान करितां हे ॥१०८॥ योगाभ्यास इच्छी जरी । सिद्धयोग व्हावा तरी । पठणमात्रें चराचरीं । मनोरथ सर्व पुरावे ॥१०९॥ कांही सांसारिक संकट पढतां नासावे निपट । व्हावें शत्रूंचे उत्कट । शासन येणें दयाळा ॥११०॥ एवं जो जो जे इच्छील । तें तें पूर्ण व्हावे सकळ । ऐसी ऐकुनिं प्रार्थना दयाळ । वरद झाला तत्काळ ॥१११॥ म्हणे सांगतों प्रमाण । इया ग्रंथाचें पठण । जो जो करील त्याचे जाण । मनोरथ पूर्ण होतील ॥११२॥ जरी लग्न व्हावे मनीं । तरी नित्य[४०] एकविंश आवर्तनीं । षण्मास पठतां अनुदिनीं । सद्भार्या त्यातें मिळेल ॥११३॥ ऋणग्रस्तें अकरा पाठ । नित्य करावे चारपट[४१] । संवत्सरें ऋणकष्ट । हरण त्यांचें करीन ॥११४॥ कुष्ठादि नाना रोग दारूण । बेचाळीस

---

४०–प्रतिदिनी. २१ वेळा स्तोत्रपाठ करणे, असे सहा महिने पर्यंत. ४१–प्रत्येक वेळी. ११ पाठ असे एका दिवसात चार वेळ करणे. असे अनुष्ठान एक वर्षभर करावे.

स्वानंदेश ॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ १७ ॥

पाठें तावद्दिन[४२] । सर्वही पावतील नाश जाण । संशय येथें न करावा ।।११५।। कार्यप्रमाण पाहून । एकविशा[४३] वाढवाव्या जाण । तेणे सर्व कार्यसिद्धि पूर्ण । होईल जाण निश्चयें ।।११६।। धर्म अर्थ मोक्ष काम । अंतीं मिळेल स्वानंदधाम । या ग्रंथांसी वर हा परम । म्या दिला जाण निजदासा ।।११७।। येथें करील जो संशय । तो अधःपाती पूर्ण होय । ऐसें स्वयें श्रीगणराय । वदला जाणा भाविक हो ।।११८।। भाव आणि दृढ विश्वास । धरितां कार्य होईल खास । अभाविकांचा ग्रास । दुर्भावना करील ।।११९।। एकाग्र करूनियां मन । निवांत स्थळीं बैसून । गणेशमूर्तीपुढें पठण । करिता अनुदिन प्रेमभरें ।।१२०।। निष्कामपणें ऐशापरीं । पठतां त्रिमासां अभ्यंतरीं । दर्शन देईल सिंदुरारी । असत्य वैखरी नोहे हे ।।१२१।। मग नमूनि दयाघन । मागावें तयासी वरदान । अखंड भक्ति परिपूर्ण । तरी पुरवील निश्चयें ।।१२२।। गिरिजेने स्मरता

४२–प्रतिदिवशी बेचाळीस पाठ करणे, असे बेचाळीस दिवसांचे अनुष्ठान, गुरूक्त विधानाने करावे. ४३–अपेक्षित कार्यानुसार एकविशीच्या प्रमाणाने अनुष्ठान वाढविणे.

अंतरीं । धांवला जैसा मत्सरारी[४४] । भस्म-संकटीं त्रिपूरारी । येऊनि स्वयें सोडविला ।।१२३।। रामा रावणवधकाळीं । भ्रांति पडतां दूर्वामाळी[४५] । रावण मारवी संकट-मेळीं । तैसा पावेल गणराज ।।१२४।। मयुरेशअवतारीं । दैत्य मारिले नानापरी । अनंत संकटीं शिव-गौरी[४६] । सोडविलेंस दयाळा ।।१२५।। ऐसा तूं परम कृपाघन । दीनबंधु गजानन । तुवां दिधलें वरदान । तूंचि सफल करावें ।।१२६।। सर्वां सुखकारक वर । देता झाला विघ्नहर । अनुभवें सिद्ध साचार । वचन जाणा नेमस्त ।।१२७।। या ग्रंथाचा कर्ता देख । जाणावा तो विनायक । ज्याचें ध्यान करिती लेख[४७] । योगी दत्तशुकादि ।।१२८।। रमारमण उमारमण । सदा चिंतिती ज्याचे चरण । तो हा साक्षात् स्वानंदघन । मयूरेश परमात्मा ।।१२९।।

---

४४–मत्सरासुराचा शत्रू, श्रीगणराज प्रभु. ४५–दूर्वेच्या माळा ज्याने धारण केल्या आहेत, असा श्रीबुद्धिपति गणराज, रामाला भ्रांति उत्पन्न झाली असता, यथायोग्य बुद्धि स्फुरवून त्यांच्याकडून रावणाचा नाश करविता झाला. ४६–शिवपार्वतींना पुष्कळ संकटे आली. त्यामधून त्यांची मुक्तता गणेशाने केली. असा तो परम कृपाळू भक्तपालक आहे. ४७–देव

ब्रह्मकमंडलु-दक्षिणतीरीं । भूस्वानंद मोरेश्वरीं । राहे गुहें त[४८] सपरिवारीं । भक्तपालक गणराज ॥१३०॥ तयाचे चरणीं अंकुशधारी । साष्टांग भावें नमस्कारी । प्रार्थना-शतक अर्पण करी । दुर्वांकुर-स्वभावें[४९] ॥१३१॥ मयूरेशीं माघमासी । मंदी कृष्ण द्वितीयेशीं । शके अठराशें चौतिशी[५०] । ग्रंथ संपूर्ण जाहला ॥१३२॥

॥ इति श्रीमत्स्वानंदेशस्तोत्रं संपूर्णम् । श्रीस्वानंदेशार्पणमस्तु ।

---

४८-मयूरेश क्षेत्रामधील दिव्य स्वरूपाच्या गुहेमध्ये, श्रीगणराज प्रभू प्रत्यक्ष नांदत आहेत. ४९-दुर्वांकुरस्वरूप असे हे स्वानंदेशस्तोत्र. ५०-शके १८३४ च्या माघ महिन्यांतील कृष्ण पक्षाच्या द्वितीयेस शनिवारी समाप्त झाले; ते श्रीअंकुशधारीमहाराजांनी, श्रीमयूरेशचरणी समर्पण केले. इत्यलं गणराजः ॥ (येथे स्वानंददेशस्तोत्र समाप्त झाले. प्रत्येक ओवीच्या शेवटी 'जयजय गणेश' म्हणावे.)

# ।। अथ श्रीनग्नभैरवराज-स्तोत्र ।।

श्रीगणेशाय नमः श्रीनग्नभैरवराजाय नमः । (श्लोकअनु.) श्रीनग्नभैरवा देवा, नमस्कार असो तुला । कृपा करूनि रक्षावा, दयाळा दास आपुला ।।१।। प्रचंड भीमरूपा हे भैरवा परमेश्वरा । सुटतो ऐकुनी कंप, त्वद्रवा करमेश्वरां ।।२।। वज्रदेहा कृपासिंधो, अधर्मिष्ठां भयप्रदा । धर्मिष्ठा रक्षिसीं प्रेमें वारुनी सर्व आपदा ।।३।। गाणेशांचा प्राणसखा, एकला तूंचि बा खरा । रक्षिसी पुढतीं मागें, मायसा स्वीय लेकरां ।।४।। श्रीभूस्वानंद सत्क्षेत्रीं, मुख्याधिष्ठान शोभलें । परंतु गाणपत्यार्थ चित्त सर्वत्र लोभलें ।।५।। सप्रेमे नाचसी देवा । गणेशानाग्रि जेधवां । देहभान न तें राहे, मोद हा वाढतो नवा ।।६।। अट्टाहासरवें देवां, दानवा कांपरे भरे । नग्नभैरव हे

स्वानंदेश ॥ स्तोत्ररत्न ॥ ॥ २१ ॥

कार्नी, ऐकतां धृति ना उरे ॥७॥ सर्वमायाविहीना हे, सर्व-माया-प्रचालका । सर्वांतर्यामिगा देवा, रक्षिं या दीनबालका ॥८॥ भुक्तिमुक्तिप्रदा स्वामिन् धनधान्यविवर्धना । योगींद्रपाला नमितों पाव रे दुष्टमर्दना ॥९॥ त्वद्भीतीने विश्व सारें भयभीतचि वर्ततें । त्वत्पादनिष्ठ गणती भवसिंधूसि गर्त ते ॥१०॥ कृपाळा भैरवा पाव, नाव आम्हांसि या भवीं । तुझी कृपा एक मात्र, आम्हां दीनां सदा हवी ॥११॥ स्तविती स्तोत्रराजें या, जे तुला करुणाघना । तयातें लेश ना होती भैरवेश्वर-यातना ॥१२॥ अनुष्टुप् वृत्तिं पहिलें रत्न श्रीनग्नभैरवा । अर्पि अंकुशधारी हा, करुनी करुणा-रवा ॥१३॥ जय जय गणराज समर्थ ।

॥ इति श्रीनग्नभैरवराजार्पणमस्तु श्रीस्वानंदेशार्पणमस्तु ॥

स्वानं-
देश ॥
स्तोत्र-
रत्न ॥
॥ २२ ॥

## ॥ सकल-भयहर-श्रीमन्नग्नभैरवराज-नमस्कार-स्तोत्र ॥

(भुजंगप्रयात-श्लोक)

मयूरेश्वराचा महाभक्तराज ॥ महासिद्धिसूनू प्रतापी विराज॥ पहा शूलधारी महा मुक्तकेशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ॥१॥ निजानंदलोकीं गणेशासमोर । पहा बालरूपी स्वमायाकुमार । करीं नृत्य मोदें हरी भक्तपाशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ॥२॥ महाव्यक्तसत्ता मुदानंदधारा । गळे व्यक्तरूपें गमे सौख्यसारा ॥ जनान्तःस्वरूपे धरी भीमवेषा । नमो नग्नसंज्ञा तथा भैरवेशा ॥३॥ सुरक्तांग सिंदूरगंधानुलिप्त । कटी वज्रकौपीन-संबध्द हस्त । असे भीतिहारी सदा ढुंढिदासां । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ॥४॥ महामंडपीं देउळीं मायुरांत ॥ सदा रक्षणीं क्षेत्रगांच्या रहात ॥ महागाणपत्यांविषीं प्रीत ऐशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ॥५॥ करी फार लीला हरी सर्व बाधा । वळे गाणपां भक्तिभावें न साधा ॥ अनन्या जनां रक्षितो त्या परेशा । नमो

नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।६।। अगाणेशभावें जधीं त्रस्त झाला । महाराज देवा शरण्यार्थ आला ।। तदा भिल्लवेषा धरी आधिनाशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।७।। जसा ये उमाठ्यावरी अंशुमाळी । तशी दिव्यतेजोज्वळी मूर्ति आली ।। पहा भैरवाची तदा विघ्ननाशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।८।। दिसे वामहस्तीं धनुष्य प्रयुक्त । तयें दक्षिणें बाण तीक्ष्ण प्रभात ।। कटीं खड्गधेन्वाख्य शस्त्रेच ऐशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।९।। जटाजूट मौळीं चलद्भृंग कृष्ण । सुवेणीकृत श्यामलांग प्रभीष्ण । जपापुष्प-रक्तांबरें भूषिलासा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१०।। त्रिनेत्र प्रभू सोमभालें विशालें । महारक्तशा ईक्षणें भीत काळे ।। पळावें अशा आदरीं भव्य वेषा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।११।। पहा कुंडलें कानिं शंखाकृतींची । गळीं मोतियांच्या प्रभा मालिकांची ।। पहा सुंदरा वीरभावा गुणेशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१२।। सुफुल्लांबुजासारिखे दिव्य वक्त्र । महापूर्णिमाचंद्रसें ब्रह्मसूत्र । दिसे मोरपिच्छीं जटा शोभिताशा

स्वानंदेश ।। स्तोत्ररत्न ।। ।। २४ ।।

।। नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१३।। महा कर्मठीं प्रेरिला आभिचारीं । नृपा गाणपा मारण्या हस्ति भारी ।। तया वारणा वारण्या सिद्धवेषा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१४।। अशा भिल्लवेषें करी सज्ज चाप । शरा योजिलें पाहुनी लक्ष्य ताप । प्रतापी गजा संस्थिता पांच कोसा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१५।। धरी ध्यान सिंहास्य-विघ्नेश्वराचे । जपीं अस्त्र सिंहास्यमंत्रे तयाचें । अशा उज्वला चापधारी परेशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१६।। टणत्कारिता चाप तो बाण वेगें । झणत्कार शब्दें निघालाच रागें । गमे सर्पराजीं महापक्षिराट्सा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१७।। दिशो व्याप्त तेजें मही धुंद झाली । सुरीं ईश्वरीं भीति मोठी उडाली ।। गजा लक्षुनि बाण गेलाच ऐशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१८।। गजा वारिले हारिले सर्व शत्रू । अगाणेश जे पीडिती ढौंढ पात्रू ।। महानंद झाला तसा गाणपेशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।१९।। मयूरेश्वरा वंदिलें भिल्लवेषें । तदा भैरवें नग्नसंज्ञें सुहर्षे ।। तये गौरविला निजानंदतोषा ।

स्वानं-देश ॥ स्तोत्र-रत्न ॥ ॥ २५ ॥

नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।२०।। असें रूप ध्यानीं धरूनी भजावें । प्रभूभैरवा आपदासीं त्यजावें ।। दिला विघ्नपें भैरवा मान ऐसा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।२१।। नसे मायिका लेश ठावा गुणांना । तरी नग्न संज्ञा तयांसी म्हणाना ।। चिदानंद-सत्यार्थभावा गुणेशा । नमो नग्नसंज्ञा तया भैरवेशा ।।२२।। (स्रग्धरा) नमस्कारस्तोत्र प्रगटमहिमा वीर गरिमा । मती ध्यातां गातां सतत भयकालींच परमा ।। तरी मायूरेशप्रभु-सुत अशा भैरववरा । कृपा येई वारीं सकल भयविघ्नादिक वरा ।।२३।। (अनु.) श्रीनग्नभैरवेंद्रांचें नमस्कार प्रभावद । स्तोत्र मी बालहेरंबें गाइलें शुद्ध सत्पद ।।२४।। ध्यानीं धरूनि तद्रूपा ममाखिलभयापहा । अर्पिलें श्रीमयूरेशपालका मोद दे महा ।।२५।। श्रीमद्‍गणेशार्पणमस्तु । श्रीमन्नग्नभैरवराजार्पणमस्तु ।।

(प्रत्येक गणेशभक्त स्त्री-पुरुषाने, प्रतिदिवशी पठण करण्यास योग्य)

## श्रीगणेशमानसपूजा-पद (चाल ब्रह्मणस्पते)

स्वानंदेशा ब्रह्म-गणेशा गजानना आजीं ।
मानसपूजा सावधचित्तें करितों ती घ्या जी ॥ध्रु.॥
मम हृदयालयिं प्रज्ञामंडपिं स्थिरसुख आसन तें ।
सुधी-वृत्तिमय-रत्नमंचकीं बसवित तुम्हांतें ॥१॥
दिव्य-सुरक्तांबर-भूषान्वित-सुगंध तिलकांहीं ।
सिंदूरारुण-गजमुख-सुंदर-रूप चतुर्भुजही ॥२॥
भालचंद्र नेत्रत्रयमंडित एकदंत ध्यातों ।
सिद्धि-बुद्धि शोभति उभयांकी सज्ज्योतिर्मय तो ॥३॥
पंचवृत्तिगा धरणी आसन योगात्मा ध्यान ।

वृत्तिशून्य-सत्प्रकाश होतां आवाहन मान ।।४।।

सुगंधसिंदुर दिव्य अर्पितो गंधगुणा वृत्ति ।

क्रियामूळ वासना भक्तिमय-भोगीं त्याविरिती ।।५।।

नानागंधित पुष्प-मालिका शमी-सुमंदार ।

दूर्वादिक अर्पितो यथास्थित मायासंहार ।।६।।

मायामोहित भाव भक्तिगुणिं चूर्ण करुनि सारे ।

गतिबद्ध असा धूप अर्पिला निश्चलधीद्वारें ।।७।।

अंतःकरणीं स्नेह उरे तद्योगे चिद्रूपीं ।

दीप शांतिग प्रभा-प्रकाशनदायी मी अर्पी ।।८।।

स्वस्वानंदीं आत्मभोग तो क्रियास्फूर्तिपूर्ण ।

ऐक्यें भोगवि नैवेद्यचि घ्या मोदकादि अन्न ।।९।।

स्वात्मार्पण-सद्‌भक्तिभाव हें सुगंध जल प्यावें ।
तृप्तिकारणीं तुम्हां खरोखर एकचि जाणावें ॥१०॥
सेव्यसेवकादि भाव-संभव जीवप्रारब्ध ।
भोगवि देहीं तीच दक्षिणा दिली पुरी शुद्ध ॥११॥
नानादानें वृत्तिसुभानें बीजे कर्माच्या ।
उठतीं भिन्नद तद्रूपचि कीं काया-मन-वाचा ॥१२॥
अर्पियली प्रार्थिलें सहचरी-योग सुभक्तीचा ।
द्यावा भोग अखंडित मी प्रिय व्हावें की तुमचा ॥१३॥
ऐंसी पूजा घेऊनि मदहृदिं अंतर्हित व्हावें ।
श्रीगणराजा माझ्या स्वामिन् प्रार्थि बाल भावें ॥१४॥

॥ इति श्रीगणेशमानसपूजापद समाप्त ॥

## ।। अथ कीर्तिविरचितं प्रियाराधनासाधनं श्रीगणेशस्तोत्रम् ।

श्रीगणेशाय नमः ।। श्रीमन्मयूरेशाय परंब्रह्मणे स्वानंदनाथाय सिद्धिबुद्धिपतेय नमः ।। श्रीमत्सकलगाणेश गुरुभ्यो नमः ।

नमूं स्वानन्दनाथाला सिद्धिबुद्धिपति-प्रती ।। सर्व सौभाग्यदाता तो सर्वामंगलनाशक ।।१।। कीर्तिकृत स्तोत्र जे कां गाणेशोक्त सुसिद्धिद ।। समश्लोकी तयाची ही तद्वीर्यसंयुता खरी ।।२।। प्रियाव्रत-राजपत्नी कीर्ति पतिप्रियास्तव ।। स्तवी भावें गणेशातें ते स्तोत्र सर्वदायक ।।३।। कीर्तिरुवाच ।। श्रीगणेश-प्रीतिकामा स्तविते मी सुखास्पद ।। मन्मनीं वांछिलें सर्व मला देवो गजानन ।।४।। जगदाधार तूं देवा सर्वकारण एक तूं ।। ब्रह्मा विष्णु बृहद्भानूत्वष्टा यमहि चंद्र तूं ।।५।। वैश्रवण वरुण वायु नदी

स्वानंदेश ।। स्तोत्ररत्न ।। ।। ३० ।।

सागर वृक्ष तूं । वेली फुलें फळें तूंचि सुखदुःखादि सर्व तूं ।।६।। सुखदाता दुःखहर्ता तद्धेतु तूं विमोचक ।। इष्टांचा विघ्नहर्ता तूं अनिष्टां विघ्नकारक ।।७।। तूंच पुत्र-धना दाता तू सर्वकामपूरक ।। विश्वयोनी तूंचि एक विघ्नहर्ताहि रक्षक ।।८।। मूलप्रकृतिपुरुष तूंचि महान् निर्गुण ब्रह्म तूं । चंद्ररुपें तूंचि विश्व पोषिसी अमृताकर ।।९।। भूत भव्य तूंचि खरा भावी भावात्मक स्वराट ।। सर्व जीवांसी आधार तूंचि शत्रूसी तापद ।।१०।। कर्मकांडी यज्ञ तूंचि शुद्धात्मा ज्ञानकांड्ग तूं । सर्वज्ञानी सर्वनिधि तूं सर्वसाक्षी सर्वग ।।११।। सर्वव्यापी सर्वविभू सर्व सत्वमय प्रभू ।। तूंचि एक सर्व मायामय सर्वविधानवित् ।।१२।। अशा स्तवें स्तवी कीर्ति नित्य पूजा करूनिया ।। स्वप्नांत दे तिला देव दर्शन तुष्ट होउनी ।।१३।। बोलिला मी तुला जालों प्रसन्न वर देतसे । तुझा कांत तुला होई सर्वदा वश जाण तूं ।।१४।। भोगिसीं सर्व

सौख्यांना सौभाग्य-पूर्ण होशि गे ॥ दीर्घायु पुत्र लाभेल मद्भक्त मत्कृपावली ॥१५॥ या स्तोत्रे स्तवितो मातें सर्वदा भक्तिमान् जनीं ॥ मला तो प्रिय होईल सर्व सौख्यांसि पावुनी ॥१६॥ राजाहि वश हो त्याला अन्याची कायशी स्थिति ॥ पुत्रवान् धनवान् ज्ञाता बुद्धिमान होइ तो पुरा ॥१७॥ मेधावृद्धि तयाची हो प्रज्ञावृद्धि दृढा तशी ॥ त्रिकाळीं पठतो स्तोत्र भक्तिभावें करूनियां ॥१८॥ भक्तिज्ञान तया लाभे विरक्ति विषयीं सदा ॥ मोक्ष-स्वानंद पावे तो मत्कृपें नाहिं संशय ॥१९॥ वर देवुनि स्वानंदी गेला विघ्नेश तत्क्षणी ॥ कीर्ति जागृत हो मोदें मानी धन्य सदा सुखी ॥२०॥ श्रीगणेशपुराणोक्त स्तोत्र कीर्ति-वरप्रद ॥ हेरंबराज-संगीत श्रीगणेशार्पणंत्विति ॥२१॥ इति श्रीमद्गणेशपुराणोक्त कीर्तिविरचित स्तोत्रं समश्लोकी समाप्ता ॥ श्रीमद्गणेशार्पणमस्तु ॥ जय जय गणराज समर्थ ॥

# श्रीमद्योगीन्द्र-गुरुनमनाष्टक-स्तोत्र (भु.प्र.)

गणेशान जो ब्रह्मविष्णवीशतात । जगत्सृष्टिकार्यादिकां मूळभूत ॥ तया भक्तराट् योगि जो वर्णियेला ॥ नमस्कार योगीन्द्रपादांबुजाला ॥१॥ निजानंद जे क्षेत्र मायूर नाम ॥ तिथें राहतो योगविश्राम धाम ॥ स्वशिष्यासि जो दे मुदें चिन्महाला । नमस्कार० ॥२॥ पहा सिंदुरारक्त भालप्रदेशीं । प्रसन्नें मुखें शोभला योगवेषी ॥ दिसे बद्ध पद्मासनां ध्यानमाला । नम० ॥३॥ यतीन्द्र प्रकाशी खरें गाणपत्य । सुसिद्धांत जे श्रौत लोकांत सत्य ॥ मठी राहुनी उद्धरी जो जगाला । नम० ॥४॥ सहस्रावधी शिष्य ज्या सेवितातीं । सुरेन्द्रादि की वंद्य जे पुण्यमूर्ति ॥ असे मुद्गलू घेइ तो विग्रहाला । नम० ॥५॥ कली पापमूर्ति जरी हा विशाल । तरी सद्गुरु सेवनें वारितील ॥ भवाच्या भया आदरा

तत्पदाला । नम० ।।६।। अनन्यें मनें भाव ठेवा भजा त्या । शरण्या जनां त्यागिना तोच सत्या ।। तरी आठवा श्रीगणेशेन्द्रपाला । नम० ।।७।। शतें दोन अठ्ठाविशी वत्सरें जो । जगीं राहिला दिव्य तेजें न साजो । दुजा ज्या सरी त्या परा सद्‌गुरूला । नमस्कार० ।।८।। अनुष्टुप् ।। योगभोगप्रसादार्थ योगीन्द्रनमनाष्टक । अर्पिले बाळ हेरंबें भक्तिभावें सदात्मक ।।९।। जयजय गणराज समर्थ ।। श्रीमद्‌गणेशार्पणमस्तु । श्रीयोगीन्द्रपादार्पणमस्तु ।।

स्वानं-
देश ॥
स्तोत्र-
रत्न ॥
॥ ३४ ॥

सच्चिद्घन चिंतामणी जयजय ॐकारा ॥ विष्णुमहेश्वरजनका जय विश्वाधारा ॥ विद्याविद्यारमणा सच्चित्सुखसारा ॥ स्वानन्देशा भगवन् दे चरणीं थारा ॥ जयदेव जयदेव जयमंगलमूर्ति ॥ तव दर्शनामात्रें हो भक्तेप्सितपूर्ती ॥धृ०॥ आद्य ब्रह्माधीशा योगिहृदारामा ॥ करुणापारावारा हे मंगलधामा ॥ मत्सरमुखदनुजारे परिपूरित कामा ॥ स्वामिन् विघ्नाधीशा दे निजसुख आम्हां ॥२॥ जय०॥ श्रीमन्मुद्गलशुकमुख दत्तादिक योगी ॥ नारायण गिरिजाधव रविमुख स्वर्भोगी ॥ तैसे संतत रत तव पदकमलीं भोगी ॥ भववैद्या शरणांकुशधारी भवरोगी ॥३॥ जयदेव०॥

श्रीमद्‌गणेशदक्षाऽदक्षांकीं वास ।। त्रिनयन शशिभालत्वहि सितपीत-सुवास ।। विद्याविद्या तुम्ही तत्त्वंपदभास ।। अंकुशधारी असिपदिं गणमय करि आस ।।१।। जयदेवी जयदेवी सिद्धी-धी माते ।। द्वंद्वाभेदें आरति करितों तुम्हातें ।।धृ०।। ।।१।।

आरती ब्रह्मणस्पति ।। नेति आणि विश्वाची गती शांति योगप्राप्तिकारणें ।। सकळ ब्रह्म तुज ध्याती ।। आरती० ।।धृ०।। समुदाय गणवाचक ।। अनंत गणांचा स्वामी ।। नाम शोभे गणपती ।। भिन्नाभिन्न नाहीं सर्व्वी ।। सगुणीं रूप धरिलें ।। तेथें ॐकार तुम्ही ।। स्वानंदीं अखंडवास, सकळ सुखाचे ब्रह्मीं ।।१।। आरती०।। सकळांचा आईबाप ।। याहुनी ज्येष्ठराज ।। भुक्ति मुक्ति आदिपद ।। आधीन सिद्धींचें साज ।। आत्मज्ञान बुद्धिनाम ।। त्यांचा पति तूं विराज ।। जयालागीं सकळ पूजिती ।। ज्ञान आणि पदांचें काज ।।२।। आरती०।। सकळ चित्ती वास तूझा ।। चिंतामणि याहून ।। सकळांची

सत्ता तूंची ।। विघ्नराज नाम जाण ।। ब्रह्म आम्ही ऐसे गर्वे ।। पदभ्रष्ट करी विघ्न ।। दुजा नाहीं तुज सरी ।। गणेशयोगी करी वर्णन ।। ३।। आरती०।।

पुत्रः कलत्रं जनकौ सुहृद्गणो ।। द्रव्यं सखावृत्तिज विद्ययायुतम् ।। स्वर्गस्तु मोक्षो विविधं त्वमेव मे ।। स्वामी गुरुर्विघ्न पतिः परात्परः ।।१।। सांसर्गिकं कायिक वाचिक परं ।। कर्माचरं मानसजं त्रिदेहतः ।। ज्ञानं हृदिस्थं च मया परात्परं ।। विघ्नेश्वरायेति समर्पितं किल ।।२।। मंगलमूर्ति मोरया ।।

श्रीमद्गिरिजासुत योगींद्राचार्य स्वामीमहाराज की जय ।
श्रीमद्गणेशयोगीन्द्राचार्यवर्य स्वामीमहाराज की जय ।।
श्रीमदंकुशधारी सद्गुरुयोगीन्द्राचार्य स्वामीमहाराज की जय ।।
श्रीमद् हेरंबराजयोगीन्द्र स्वामीमहाराज की जय ।।
श्रीनग्नभैरवराज की जय ।।

## ।। श्रीगणेशोपासना प्रधानज्ञानदायी गणेशजगद्गुरुपीठ ।।

## ।। श्रीमद्गणेश नमनाष्टक स्तोत्र ।।

अगा हे निजानंदवासिन् सुरेशा । कृपासागरा भालचंद्रा परेशा ।।
तुला प्रार्थितो मी प्रभो विघ्ननाशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।१।।
महा विष्णु तो जन्मला त्वन्मुखात । महा शंभुही वर्णिला नेत्रजात ।।
विधी जन्म घे पासुनि नाभिदेशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।२।।
महाशक्ति झाली तुझ्या वाम अंगी । तसा सूर्यही जाहला दक्षभागी ।।
तुझे पुत्रहे पंचदेवेश ईशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।३।।
तुवां धीपते घेऊनी वेष नाना । नरांतादिकां मारिले दुर्जनांना ।।
सदा सज्जना देशी बा पूर्ण तोषा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।४।।
अहो राहसी इक्षुच्या सागरांत । अजा विघ्नपा लक्षलाभादितात ।।
स्वभक्तांचिया तोडी संसारपाशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।५।।
प्रिया सिद्धी बुद्धी तुझ्या दोन जाया । जगा मोहविती अनाद्यंत गाया ।।
तया आंवरी तूचिं हेरंबधीशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।६।।

मयुरेश्वरा मोरया ढुंढिराजा । विभो विघ्नपा ज्येष्ठराजा धिराजा ।।
कृपा वीतरी सेवकी ब्रह्मवेषा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।७।।
अनंतापराधा क्षमावे दयाळा । स्वपादाब्ज दावी मला चंद्रभाळा ।।
पुन्हा प्रार्थना हि तुझ्या पाददेशा । नमस्कार माझा तुला श्रीगणेशा ।।८।।

**।। जय जय गणेश ।।**

## ।। श्री गणराज समर्थ ।।

श्रीगणेश प्रीतीसाठी जन्माजन्मातरीची पुण्यकर्मे जी घडलेली असतात, त्यांचा परिपाक उदित झाला, म्हणजे श्रीगणेशाच्या ठिकाणी प्रेमभाव उत्पन्न होतो. श्रीगणेश उपासना म्हणजे पूर्ण ॐ काराची उपासना. अन्य कोणतीही अंशात्मक ॐ काराची उपासना होते. परंतु पूर्णार्थाने होत नाही. श्रीगणेशाला वेदांनी ‘‘ब्रह्मणां ब्रह्मणस्पती’’ असे वर्णिले आहे. आपल्या भक्तिभावाचे समर्पण देवतेचे महत्त्व जाणून व यशोक्तरीत्या शास्त्रविधीला अनुसरून गणराज प्रभुच्या ठिकाणी अर्पण करणे यालाच

(गणेशभक्ति) गणेशोपासना म्हणावे. गुरुपीठ सांप्रदायाशिवाय उपासना पूर्ततेला जाऊ शकत नाही. तेव्हा गाणेश सद्गुरुंकडून योग्य सांप्रदाय घेऊन त्याप्रमाणे वर्तन ठेवणे, त्यातच मानवजन्माचे सार्थक आहे.

## श्रीगणेशोपासनेचा पहिला धडा

१) गणेशाला सिंदूर अत्यंतप्रिय असल्यामुळे व गणेश सांप्रदायाचे चिन्ह असल्याने स्नानानंतर प्रत्येक गणेश भक्ताने सिंदूर लावणे आवश्यक आहे.

२) दोनही चतुर्थ्यांचे पूर्ण मुद्गल सांप्रदायानुसार पूर्ण उपोषण करणे. संकष्टी चतुर्थीचे दोन प्रकार आहेत. दिवसभर उपोषण करून चंद्रोदयाचे वेळेस पारणे करणे हा सकाम व एकदेशीय भक्तांचा मार्ग आहे. परंतु निष्काम व्रत करण्यास व एकनिष्ठ गाणपत्यांसाठी ''यथाशुक्ला तथा कृष्णा चतुर्थी गाणपोत्तमैः'' या नुसार जशी विनायकी करतो, त्याचप्रमाणे दिवसभर व अष्टोप्रहर

उपवास (फराळ केला तरी चालेल) व चंद्रोदयाला फक्त गणेशपूजन व फराळाचाच नैवेद्य दाखवून पंचमीला पारणे करणे, हेच योग्य आहे. चतुर्थी ही व्रतमाता असून तिच्या पासूनच बाकीच्या तिथी उत्पन्न झाल्याचे श्रीमुद्‌गल पुराणांत वर्णन आहे. त्यामुळे चतुर्थी व्रत हे सर्वांनाच आवश्यक आहे.

३) ज्या पदार्थामुळे तमो गुण वाढतो व विचार आचार बिघडतो, असे पदार्थ वर्ज करणे.

४) वर्षातून दोनदा श्रीयोगीन्द्र उत्सव व भाद्रपदी द्वारयात्रा यावेळी श्रीयोगीन्द्र मठात उपस्थित राहून सेवा व सत्संग साधणे. कित्येक लोक असा विचार करतील की,

''असल्या गर्दीत नको, आम्ही सवडीने जाऊ'' तेव्हा असा विचार योग्य नव्हे. कारण व्यवहारात आपण पाहतो, की आपल्या घरी विवाह अथवा अन्य आनंद सोहळा असतांना आपले आप्तइष्ट मित्र यावे असे आपणांस वाटते व अशा वेळी लोक जर म्हणाले

की, असल्या गर्दीत नको. नंतर येऊ तर आपणांस काय वाटेल? तेव्हा यथादेहे, तथादेवे या न्यायाने उत्सव, भगवंताचे अवतार वगैरे महत्वाच्या वेळी भगवंताचा आनंद सोहळाच असतो. अशा वेळी अनेक भक्तांच्या प्रार्थनेने, इच्छा शक्तीने भगवंताला तेथे यावेच लागते. म्हणूनच आपण अशा प्रसंगी जरुर व प्रयत्नपूर्वकच आले पाहिजे. मोरगांव क्षेत्रामध्ये गाणेश जगद्गुरुंचा अखंड वास आहे व द्वारयात्रा केल्याने धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चारही पुरुषार्थांची प्राप्ती होते व संपूर्ण त्रिभुवनातील क्षेत्र यात्रा घडल्याचे पुण्य प्राप्त होते, कारण पंचदेवांचे मुख्य ठिकाण द्वाराच्या ठिकाणीच प्रामुख्याने आहे.

५) श्रीस्वानंदेश स्त्रोत्र रोज वाचणे व श्रीनग्नभैरवराज स्तोत्र रोज पठण करणे. श्री नग्नभैरवराज हे गणेशाचेच निग्रहरुप असून अनुग्रहाचा अधिकार गाणेश सद्गुरुंचा आहे. श्री गजानन प्रभुनी वरेण्यराजाला गीतेत सांगितले की, सर्वगोष्टी अनेकवेळा कितीही

अवघड असल्यातरी प्रारब्धाने भेटतील. परंतु ''सत्संग मात्र फारच दुर्लभ आहे.'' सत्संग म्हणजे कल्याणकारी विचार व असे विचार भगवंताशिवाय असूच शकत नाहीत. त्यामुळे ज्या ठिकाणी भगवंताचे नाम, तोच खरा सत्संग. प्रत्येक गणेशभक्तांनी नित्य अथवा किमान आठवड्यातून एकवेळ सामुहीकरित्या सत्संग करावा.

साधारण वेळ सायंकाळी पाचनंतर आपल्या व सर्वांच्या सोयीनुसार ठरवावी. सामुहीक सत्संग एकाच्याच घरी न ठेवता आळीपाळीने प्रत्येकाच्या वास्तूत घडेल अशाप्रकारे करावा. चौरंगावर श्रीगणेशाचा (मोरयाचा) फोटो व गाणेशजगद्गुरु गणेश योगीन्द्र महाराज व श्रीनग्नभैरवराजांचा फोटो ठेवून हार, दूर्वा, निरंजन, उदबत्ती व नैवेद्याला खडीसाखर ठेवून सर्वांनी शांतचित्ताने स्तोत्रपाठ मोठ्याने एकसुरात म्हणावा. त्यानंतर ''श्री गजानन जय गजानन जय जय गजानन'' हा नाममंत्र ध्यानपूर्वक १०८ वेळा करावा व श्रीगणेशकृपाप्रसादाचा लाभ घ्यावा.

॥ श्री गणराज समर्थ ॥

## गणेशोपासना प्रधान ज्ञानपायी गाणेश जगद्‌गुरुपीठ

## श्री ब्रह्मभूयमहासिद्धिपीठ

## अथवा

## श्रीयोगीन्द्रमठ – (क्षेत्र मोरगांव)

**श्रीयोगीन्द्रमठाचे कार्य:–** नवधाभक्ती प्रमाणे यथाशास्त्र गणेशभक्ती करणे. तसेच गणेशाची कृपा मिळविण्याची इच्छा असणाऱ्या भक्तांकडून चतुर्थी व्रतपूर्वक गणेशभक्ती योगीन्द्रसांप्रदायानुसार निग्रहपूर्वक करवून घेणे.

गणेश उपासने संबंधी योग्य मार्गदर्शन करुन साधने, गणेशग्रंथ, पुराणांतर्गत स्तोत्रे इ. उपलब्ध करुन देणे.

**श्री मोरेश्वर क्षेत्री येणाऱ्या गणेशभक्तांचे प्रथम कर्तव्य :–** प्रथमत: या गाणेश गुरुपीठाचे दर्शन घेऊन गणेश तीर्थस्नान व योगीन्द्रमठानुज्ञेने नित्ययात्राविधीपूर्वक मोरेश्वराची सेवा साधणे.

श्री नग्नभैरवराजप्रभुचे तसेच योगीन्द्र समाधीचे दर्शन घेऊन मठानुशासनाप्रमाणे उपासना साधणे.

**श्री योगीन्द्रमठाची पूर्व परंपरा :–** या गुरुपीठाला आद्य कृतयुगापासूनची परंपरा आहे. कलीयुगातील या पीठाचे आद्य आचार्य – श्रीमद्‌गिरीजासुत योगीन्द्र महाराज यांनी आद्य शंकराचार्यांच्या उपदेशाप्रमाणे या योगीन्द्र मठाची स्थापना केली.

**श्रीमद् गणेश योगीन्द्राचार्य महाराज :–** हे स्वत: प्रत्यक्ष मोरयाचे व मुद्‌गलांचे पूर्णावतार होते. २२८ वर्षे इतके दिर्घ आयुष्य त्यांना लाभले होते. त्यांनी संपूर्ण गणेश मार्गाचा प्रसार केला. पाखंडी लोकांचे पूर्ण खंडण करुन सर्वत्र दिग्वीजय केला. कोट्यावधी सांप्रदायी त्यांनी निर्माण केले. मोरेश्वर क्षेत्राचा जीर्णोद्धार त्यांनी केला. त्यांचा अधिकार एवढा मोठा होता की, प्रत्यक्ष त्यांची सेवा करता यावी, यासाठी स्वत: विष्णू, शिव, सुर्य, ब्रम्हदेव व गुणेश या पांच देवांनी मानव देह धारण करुन

त्यांचे शिष्यत्व पत्करले. मोरेश्वर क्षेत्रात राहून त्यांनी अखंड मोरयाची सेवा केली.

यांचा    अतवार काळ – श्रावण शु. ५ शके १४९९
         समाधी काळ – माघ वद्य १० शके १७२७

श्रीमद् गणेशयोगीन्द्र महाराजांच्या नंतर सुमारे पन्नास पाउणशे वर्षे हा काळ लुप्त होता. त्यानंतर श्रीमद्अंकुशधारी महाराज यांनी योगीन्द्रांच्या आज्ञेने या गुरुपीठाचा पुनरुद्धार केला. गणेश भक्तांच्या कल्याणासाठी निरनिराळी स्तोत्रे इ. रचून गाणेश ग्रंथ अनुष्ठान पूर्वक मिळवून देऊन भक्तांना मार्ग मिळवून दिला. मोरयाला प्रसन्न करून घेऊन आयुष्यभर मठात राहून तप केले व साधकाने कसे रहावे, याचा आदर्श भावीकांसमोर ठेवला.

यांचा    अवतार काळ – मार्गशीर्ष शु. ६ शके १८०१
         समाधी काळ – माघ शु. १५ शके १८४१

यानंतर अंकुशधारी महाराजांचे शिष्य श्री गाणेश वरिष्ठगाणपत

श्रीमद् हेरंबराज महाराज यांनी या योगीन्द्रमठाचे कार्य चालविले. त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षीच आपल्या घराचा त्याग करून अखंड गुरुसेवेला वाहून घेतले. आदर्श गुरुसेवा कशी असावी याचा आदर्श साधकांसमोर ठेवला. कठोर तपश्चर्येने गणेशाला प्रसन्न करून घेऊन मठात राहून अंकुश मासिक पन्नास वर्षे चालविले व गणेशभक्तीचा प्रसार केला.

यांचा अवतार काळ – श्रावण शु. ७ शके १८१४

समाधी काळ – पौष शु. १ शके १८९६

**श्री योगीन्द्रमठातील व्रतांमधील अत्यंत महत्वाचे उत्सव**

**श्रीमयुरेशजन्म – भाद्रपद शु. १ ते ४**

**श्रीयोगीन्द्र पुण्यतिथी उत्सव माघ शु. १५ ते माघ वद्य १०.**

**– श्री. गा. बालविनायक महाराज लालसरे**

**मोरगांव (जि. पुणे)**

**॥ जय जय गणराज समर्थ ॥**

## ॥ श्रीनग्नभैरवाय नमः ॥

ॐ अस्य श्रीमन्नग्नभैरवस्तोत्रमंत्रस्य भगवान् श्रीमन्मुद्गल ऋषिः अनुष्टुप् छंदः श्रीमन्नग्नभैरवराजो देवता । श्रीमन्नग्नभैरवप्रीत्यर्थे जपे विनियोगः । श्रीगणेशाय नमः । देवेशा ऊचुः । एतादृशो महाभागो नग्नभैरवनायकः । स्तोत्रं तस्य वद स्वामिन् संस्तुमस्तं निरंतरम् । बुद्धिभेदात्स नः क्रुद्धः करिष्यति विशेषतः । क्षेत्रप्रवेशहीनांश्चेदतस्तं सेवयामहे । श्रीमन्भ्रूशुंड्युवाच । ॥ ध्यानं ॥ श्रीमन्मयूरपुरपालकमादिदेवम् । ब्रह्मेशविष्णुरविभीतिकरं परं तं । सिंदूरचर्चितमजं वरशूलधारं श्रीनग्नभैरवमहं शिरसा नमामि ॥ ॐ सर्वमायाविहीनाय सर्वमायाप्रचालक । सर्वांतर्यामिने नित्यं नग्नभैरव ते नमः ॥१॥ मयूरेशपरायैव मयूरपुरपालक । धर्मिष्ठानां सुपालाय नग्नभैरव ते नमः ॥२॥ अधर्मानिरतांश्चैव बहिःकाराय देवप । सदा स्वानंदनिष्ठाय नग्नभैरव ते नमः ॥३॥ संस्कारयुक्तभावेन पापकर्मपरात्मनाम् । मयूरे दंडकर्त्रे वै नग्नभैरव ते नमः ॥४॥ महाबलधरायैव ब्रह्मादीनां प्रचालक । अमेयशक्तये देव नग्नभैरव ते नमः ॥५॥ भुक्तिमुक्तिप्रदात्रे च धनधान्यविवर्धन । गाणेशानां

प्रपालाय नग्नभैरव ते नमः ॥६॥ प्रलये शूलमुद्यम्य ब्रह्मांडभयकारक । शूलप्रोतमहांडाय नग्नभैरव ते नमः ॥७॥ अट्टाहासेन देवेन्द्रांस्तथा संत्रास्य चासुरान् । नृत्यसे गणनाथाग्रे नग्नभैरव ते नमः ॥८॥ विश्वं ततं सर्वमिदं त्वयेश आद्यंतमध्येषु महानुभाव । संरक्ष देवेश मयूरसंस्थानस्मान् कुरुष्व त्वमनन्यभावान् ॥९॥ शूलिन्नमस्तेऽखिलकारणाय त्वद्भीतिभावेन जगत्प्रवृत्तिः । व्यापारयुक्तं विविधेषु नित्यं स्वस्वप्रकार्यं प्रकरोति चात्मन् ॥१०॥ अतस्त्वदाधारमयं परेश सुरक्ष ते भक्तियुतं कुरुष्व । गणेशक्षेत्रं त्वदधीनगं तु । गणेशसस्थं कुरु ते नमो वै ॥११॥ इदं स्तोत्रं महेशाना नग्नभैरवकस्य च । यः पठेच्छृणुयाद्वाऽपि स सर्वं प्रलभेच्छुभम् ॥१२॥ धनधान्यादिकं सर्वं भुक्तिमुक्तिसमन्वितम् । लभेदनेन देवेशास्तुविध्वं नग्नभैरवम् ॥१३॥ मयूरक्षेत्रत्यागश्च कदापि न भवेन्नृणाम् ॥ स्तोत्रेण स्तुवतां नित्यं न किंचिद् दुर्लभं भवेत् ॥१४॥ ओमिति श्रीमदान्त्ये पुरोणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे श्रीविकटचरिते अष्टाविंशतितमोध्याये श्रीनग्नभैरवप्रशंसास्तोत्रं संपूर्णम् ॥ श्रीगणेशार्पणमस्तु ॥ जय जय गणराज समर्थ ॥

श्रीमत्सद्गुरुनाथ-श्रीअंकुशधारीमहाराजांनी समग्र परमार्थ-जिज्ञासु गणेशभक्तांना शीघ्रसिद्धी मिळावी, व पात्रापात्रादि विचार न करता, निर्मळ भावाच्या आश्रयाने सर्वांनाच श्रीगणेशप्रसाद मिळविता यावा, अशा मुख्य अपेक्षेने व योगयुक्त अंत:करणाने, हे श्रीस्वानंदेशस्तोत्र रचिले आहे.

वि. सू. श्रीगणेशकृपा श्रीयोगींद्रकृपेच्या आधीन आहे; म्हणून तशी योगीन्द्रकृपा मिळावी यासाठी श्रीमद्योगीन्द्रगुरु नमनाष्टक दिले आहे. दररोज हे स्वानंदेशस्तोत्राचे शेवटी अवश्य पठण करून श्रीयोगींद्र नमन साधावे, इत्यलं गणेश: शरणम्

## श्री योगीन्द्रमठाद्वारे प्रकाशित गाणेश वाङ्मय

◆ श्रीगाणेश मनाचे श्लोक ◆ करुणाष्टक ◆ वक्रतुंड स्तोत्र ◆ गाणेश भजन पद्धती ◆ भूपाळी समूह ◆ रोगशमनाष्टक ◆ श्रीगणेश सहस्रनाम ◆ पंचरत्न पाठ ◆ चतुर्थी माहात्म्य ◆ श्री गणेश गुह्य ◆ श्रीयोगीन्द्र गुह्य ◆ द्वारयात्रा महत्व ◆ गणेश पूजा विधी ◆ श्री गणेशाचे सर्व पूज्यत्व ◆ श्रीमद् गणेश पुराण (मूळ संस्कृत व मराठी अर्थासह) ◆ श्रीमद् गणेश विजय ग्रंथ ◆ श्री योगीन्द्रविजय ◆ श्रीमद् योगेश्वरी ◆ श्री गणेश योगीन्द्र चरित्र ◆ लक्षविनायक महिमा ◆ श्री हेरंबराज महाराज चरित्र ◆ श्री भूस्वानंद क्षेत्र वर्णन ◆ गाणापत आरती संग्रह ◆ व इतर स्तोत्रे


**- संपर्क -**

**श्रीगा. बालविनायक महाराज लालसरे**

श्रीगाणेशजगद्गुरुपीठ श्रीयोगीन्द्रमठ, मोरगांव, जि. पुणे ४१२ ३०४

दूरभाष्य - (०२११२) २७९७४३ भ्रमणभाष्य - ९८५०९३१४७९

**- मराठवाडा संपर्क -**

**श्री मयुरेश्वर गणेश ध्यान मंदिर**

माऊलीनगर मागे, बीडबायपास रोड, देवळाली परिसर, औरंगाबाद

दूरभाष्य - (०२४०) २६५४६८२ भ्रमणभाष्य - ९९२१६४२०३४



**(सर्व हक्क गुरुपीठाचे स्वाधीन)**